# गडचिरोली जिल्हा पोलीस भरती-२०१८

## लेखी चाचणी परिक्षे करिता पात्र उमेदवारांना सुचना

१) पोलीस भरती -२०१८ चे परिक्षे करिता पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा **दिनांक ०५/०४/२०१८ रोजी सकाळी ०५-०० वाजता पोलीस कवायत मैदान, पोलीस मुख्यालय, गडचिरोली** येथे घेण्यात येणार आहे. तरी लेखी परिक्षे करीता पात्र उमेदवारांनी वरिल ठिकाणी वेळेवर हजर रहावे. उशिरा येणाऱ्या उमेदवारांना प्रवेश देण्यात येणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२) गडचिरोली जिल्हा पोलीस भरती - २०१८ चे लेखी परिक्षे करीता पात्र उमेदवारांची यादी पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांचे **www.gadchirolipolice.gov.in** संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

३) पात्र उमेदवारांनी लेखी परिक्षेकरीता येतांना पोलीस भरतीचे ओळखपत्र व फोटो असलेले मुळ (ओरीजनल) ओळखपत्र (मतदार कार्ड/आधार कार्ड/पॅन कार्ड/वाहन चालक परवाना यापैकी कोणतेही दोन ) सोबत आणावे.

४) लेखी परिक्षेकरीता येतांना उमेदवारांनी काळया शाहीचा बॉलपेन सोबत आणावा. उमेदवारांनी परिक्षा केद्रामध्ये कोणतेही पुस्तक/ बॅग/ मोबाईल/ हॅन्डफोन/ ब्लुटुथ/ कॅल्कुलेटर व कोणत्याही प्रकारची मेमोरी डिवाईस इ. साहीत्य सोबत आणु नये. तसेच त्यांचे खिशात कोणतेही कागदपत्र राहणार नाही यांची दक्षता घ्यावी.

५) उन्हाची तिव्रता लक्षात घेता उमेदवारांनी तहान भागविण्याकरीता पाण्याची बाटली सोबत ठेवावी.

६) उत्तर पत्रिका (ओएमआर शिट) उमेदवारांकडुन हाताळताना खराब/ घाणेरडी/ ओली झाल्यामुळे तपासता न आल्यास त्यांचे सर्वस्वी जबाबदारी उमेदवारांची राहील.

७) उमेदवार परिक्षेसाठी वेळेवर उपस्थीत न झाल्यास त्यांना परिक्षेसाठी बसु दिले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

८) परिक्षे दरम्यान गैरवर्तनुक करणे/ मोबाईल फोन हाताळणे/ प्रत्यक्ष मुळ उमेदवारा ऐवजी डमी उमेदवारांने प्रवेश करण्याचा प्रयत्न करणे असा प्रकार आढळल्यास संबधीत उमेदवारास भरती प्रक्रियेतुन अपात्र करुन गुन्हा दाखल करण्यात येईल याची उमदवारांनी नोंद घ्यावी.

दिनांक - २८/०३/२०१८

प्रभारी पोलीस अधिक्षक, गडचिरोली